# महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६ ००४.

---

क्र.कोविमं/१२ वी परीक्षा/ 2543
दिनांक- ०१/१२/२०१९

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/ कोल्हापूर

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु-मार्च २०२० परीक्षेस आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती स्वीकृती तसेच जुलै-ऑगस्ट २०१९ मूळ प्रमाणपत्रे वितरणाबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की , **आपल्या कनिष्ठ महाविद्यालया मार्फत फेब्रु-मार्च २०२० इयत्ता १२ वी परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांची यादी,प्री-लिस्ट, फी डिटेल्स प्रमाणे शुल्क भरलेचे चलन इत्यादी कागदपत्रेही यापूर्वी निर्धारित केलेप्रमाणे जिल्हा वितरण केंद्रावर** सोमवार दि.०९/१२/२०१९ रोजी **स्वीकारली जाणार आहेत.** त्याच वेळी **जुलै-ऑगस्ट २०१९** च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस आपल्या कनिष्ठ महाविद्यालया मार्फत प्रविष्ठ होवून उत्तीण झालेल्या विद्यार्थ्याची मूळ प्रमाणपत्रेही हस्तपोच वाटप केली जाणार आहेत. तरी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रतिनिधी अधिकृत पत्रासह दि.०९/१२/२०१९ रोजी कार्यालयीन वेळेत जिल्हा वितरण केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करावी .

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

**जिल्हा वितरण केंद्रांसाठी सूचना**

वरीलप्रमाणे आपल्या वितरण केंद्रावरुन दिनांक ०९.१२.२०१९ रोजी **जुलै-ऑगस्ट २०१९ परीक्षेच्या** प्रमाणपत्रांचे वाटप करण्याबरोबरच फेब्रु-मार्च २०२० इयत्ता १२ परीक्षेसाठी आवेदनपत्रे भरलेल्या विद्यार्थ्यांबाबत कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्राप्त होणारी कागदपत्रे कनिष्ठ महाविद्यालयनिहाय यादीसह कोणत्याही परिस्थितीत बुधवार दिनांक ११.१२.२०१९ रोजी या कार्यालयाकडे हस्तपोहोच जमा करावयाची आहेत.